# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २८३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०६/२०१८

**१) सोन्या व चांदीचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी :–**

दिनांक ०२/०६/२०१८ चे १८.३० ते ०३/०६/२०१८ वा ते ०३/०६/२०१८ चे ०६.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी शामराव परसराम साठवणे वय ३७ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड वरठी हा बाहेर गावी कुटुंबासह गेला असता त्याचे घराचे समोरील गेटचे व दरवाज्याचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन माज घरात ठेवलेला गोदरेज आलमारीतील १२ ग्रॅम सोन्याचा गोप, १ नग सोन्याची अंगठी वजन ५ ग्रॅम, १ नाकातील नथनी वजन ३ ग्रॅम, १ गळयातील मंगळसुत्र वजन ५ ग्रॅम, चांदीची चाळ वजन ८ तोळा व नगदी १६,०००/–रु. असा एकुण ६७,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खोकले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**२) सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी :–**

दिनांक ०३/०६/२०१८ चे ११.३० ते १७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी बाळप्रकाश कबाजी सरादे वय ६७ वर्ष, रा. तिलक वार्ड आंधळगाव रोड मोहाडी हे त्याचे मुलीचे लग्न करीता मोहाडी येथे नवप्रेरणा विनकर मंगल कार्यालय आंधळगाव रोड मोहाडी येथे स्वत:चे राहते घराला कुलुप लावुन गेले असता लग्न कार्यक्रम आटोपुन अंदाजे १६.३० वा. ते १७.०० वा. दरम्यान घरी परत आले असता घराचे समोरील दाराचा कुलुप तोडुन कोणीतरी अज्ञात चोराने घरामध्ये ठेवलेले सोन्याचे टॉप्स जुने पुराने वजन ३ ग्रॅम, सोन्याचे कानातील रिंग वजन ५ ग्रॅम, सोन्याच्या बांगळया जुण्या पुराण्या प्रत्येकी १५ ग्रॅम, एकुण ३० ग्रॅम व नगदी २४,०००/–रु. असा एकुण ६६,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०२/०६/२०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती केवळराम मोहरकर वय ७० वर्ष, रा. जुनोना ही तिचा मुलगा घनश्याम याचे सह घरी येत असतांना यातील आरोपी क्र. १ ते ३ यांना रस्ता अडविला फिर्यादीचा मुलगा घनश्याम याने आरोपी क्र. १ ते ३ यांनी म्हणाला रस्त्याचे बाजुला व्हा यावरुन आरोपी हे त्यास म्हणाले की बाजुला हो असे तु कुणाला म्हणाला असे म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन त्यास मारपीट केली त्यानंतर फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा घरी गेले असता त्यांचे पाठोपाठ यातील आरोपी क्र. १ ते ४ हे फिर्यादीचे घरी गेले आणि फिर्यादी व तीचे सुनेनी दरवाजा बंद केला असता आरोपीतांनी दरवाज्याला हाताने व लाथांनी तोडुन घरात प्रवेश करुन फिर्यादीस व फिर्यादीची सुन जोत्सना व नातीन तेजस्वीनी हीला मारपीट करुन घनश्याम कुठे आहे. त्याला बाहेर काढा त्याचा मर्डर करतो असे म्हणाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२३,३४१,४५२,२९४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) लोखंडी कोयत्याने मानेला व डोक्यावर मारुन गंभिर जखमी करुन जिवाने मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०३/०६/२०१८ चे १२.३० यातील जखमी सौ. किरण विजय दिघोरे वय ४० वर्ष, रा. उमरी ता. पवनी ही आरोपीची गावात वेगवेगळे राहतात आरोपीची पत्नी जखमीची लहान बहीन ही अंदाजे दिड महीण्यापासुन तीचा भाटवा किरण सिरकर रा. भुयार यांचे कडे राहते याच कारणा वरुन यातील आरोपी हा जखमीचे घरात जबरदस्तीने घुसुन तीला म्हणाला की तुच माझ्या पत्नीला भडकविले त्यामुळे माझी पत्नी बाली ही मला सोडुन भाटव्याकडे राहात आहे, असे म्हणुन जखमी सोबत भांडण करुन आरोपीने शेतात उपयोगी येणाऱ्या लोखंडी कोयत्याने जखमीला उजवी कडुन मानेला व डोक्यावर मागच्या भागाला वार करुन गंभीर जखमी करुन जिवाने मारण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३०७,४५० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) संशयाचे कारणावरुन विट फेकुन मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०३/०६/२०१८ चे २०.३० यातील आरोपीने फिर्यादी पत्नीचे चारित्र्यावर संशय घेवुन पत्नीला, भावाला व वहीनीला शिवीगाळ करुन हाता बुक्यांनी मारहान करुन जखमी केले असुन तसेच फिर्यादीला विट फेकुन मारली असता फिर्यादी पत्नीचे डोक्याला लागुन जखमी झाल्याने व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी भुवनेश्वरी लोमेश ठाकरे वय ३६ वर्ष, यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३३६,३२४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चिचखेडे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

६) ट्रक चालकाने स्कुटी चालकाला धडक देवुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०३/०६/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील मृतक आरीफ रफीक शेख वय २६ वर्ष, रा. सुभाष वार्ड मोहाडी हा पांढऱ्या रंगाची स्कुटी गाडी क्र. एमएच ३६ यु २५६१ ने बस स्थानक चौक कडे जात असता विरुध्द दिशेने येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालुवन मृतक चालवित असलेल्या स्कुटीला धडक मारुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १८४,१३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

७) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०३/०६/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर हा बोरगाव शिवार येथेयेथे सार्वजनिक रोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. गौतम पो.स्टे. करडी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गौतम पोलीस स्टेशन करडी करीत आहेत.

८) अवैध हातभट्टी,देशी दारु / जुगार अडड्यांवर धाडी . :–

दिनांक ०३/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा व वरठी येथे हातभट्टी दारु अडड्यावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४० लिटर हातभट्टी किंमती २८००/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०३/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०४, तीन सिटर वाहनाकरीता– ०६ ईतर वाहनांवरती – ८० केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.